| | |
|---|---|
| | **नियमित दिवाणी दावा ७६/२०१६**<br>**श्री. मारुती दौलत करंबळे वगैरे ७**<br>**वि.**<br>**शकुंतला भिमराव करंबळे वगैरे ८** |

## नि.६२ खालील आदेश

१. प्रस्तुत अर्ज वादी याने दाखल केलेल्या कागदपत्रांना निशाणी देण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे त्याच अर्जावर सादर करुन अर्जास विरोध दर्शविला आहे.

३. वादी तर्फे सन्माननिय वकिल यांनी युक्तिवाद केला की, वादी याने नि. ५८ च्या कागदपत्रे हजर करावयाच्या परवानगीसोबतच्या अर्जासोबत नि. ५९ ने कागद यादी हजर केलेली आहे. कागदयादी सोबत अ. क्र. १ ते ३ ने कागदपत्रे हजर केलेली आहेत त्या कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नि. ५९ च्या कागदयादीसोबत अ. क्र. १ ते ३ च्या कागदपत्रांना निशाणी क्रमांक देणेबाबतचा अर्ज सादर करणे भाग पडलेले आहे. वादी यांनी सदरचा अर्ज दाखल करणेस जाणुन बुजून विलंब केलेला नाही. नि. ६२ ला प्रतिवादी वसंत कांबळे यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. त्याच्या सरतपासाचे शपथपत्र नि. ५९ च्या कागदयादीसोबच्या अ. क्र. १ ते ३ च्या कागदपत्रांचा उल्लेख केलेला आहे व ती कागदपत्रे प्रतिवादींनी शपथपत्राद्वारे शाबित केलेली आहेत. सदर निशाणी क्रमांक देणेबाबतचा अर्ज मंजूर झाल्यास वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच सदरचा अर्ज मंजूर झाल्यास न्यायदानास मदत होणार आहे. नि. ५९ च्या कागदयादीसोबत अ. क्र. १ ला खरेदीपत्राची अस्सल प्रत हजर केलेली आहे. अ. क्र. २ फेरफार हजर केलेला आहे व अ. क्र. ३ ला खरेदीपत्राची झेरॉक्स प्रत हजर केलेली आहे. तसेच कागदयादीसोबत अ. क्र. १ च्या खरेदीपत्राचा कागदपत्र जे खरेदीपत्र १९६३ सालचे आहे. त्यामुळे सदर कागदपत्रांना निशाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी सदर कागदपत्रांना निशाणी देण्यात यावी अशी विनंती केली.

४. प्रतिवादी तर्फे सन्माननिय वकिल यांनी असा युक्तिवाद केला की, वादी याने दाखल केलेला

अर्ज खोटा व खोडसाळ असून तो कायदयाने टिकणारा नाही. त्यामुळे मे. न्यायालयाने योग्य तो आदेश पारीत करावा. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकिल वादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर व्हावा अशी विनंती केली.

५. अर्ज, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले असता, ही गोष्ट दिसून येते की, वादी याने दाखल केलेल्या नि. ५९ च्या कागदयादीसोबत अ. क्र. १ ला खरेदीपत्राची अस्सल प्रत दिसून येत आहे. मात्र सदर खरेदीपत्र हे भारतीय पुरावा कायद्यानुसार प्रतिवादी यांनी शाबीत केलेले नाही.

६. तसेच नि. ५९ अ. क्र. २ येथे २२०८ या फेरफाराची सहीसूद नक्कल हजर करण्यात आली असून त्यावर तहसिलदार पन्हाळा यांचा सही व शिक्का दिसून येत आहे. त्यामुळे सदर फेरफारास भारतीय पुरावा कायद्यानुसार गृहीतक लागू होईल असे वाटते.

७. तसेच नि. ५९ अ. क्र. ३ येथे वादी यांनी सेल सर्टिफिकेटची झेरॉक्सप्रत हजर केलेली आहे. सदर प्रत भारतीय पुरावा कायद्यानुसार प्रतिवादी यांनी शाबीत केलेली नाही. त्यामुळे वादी यांचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे वाटते. सबब मी पुढील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१. वादी यांचा नि.६२ वरील अर्ज खर्चासह अंशतः मंजूर करणेत येत आहे.**

**२. फेरफार क्र. २२०८ यास निशाणी क्र. ६४ देण्यात येत आहे.**

सही/-

दिनांक १०/११/२०२५

**के. दि. काकतकर**
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पन्हाळा.